# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/06/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## घरफोडीचा प्रयत्न

पो.स्टे. कुही :– अंतर्गत ३० कि. मी. अंतरावरील मौजा पाचगाव येथे दि. १९/०६/२०२३ चे ०१.०० वा. सुमारास यातील छाया हटवार ही गावाला गेली असता तिच्या दारात आरोपी नामे– **1) चेतन बुरडे दोन्ही रा. आंबेडकर चौक गल्ली नं. १६ नंदनवन झोपडपटटी नागपुर** हा आला व लॉक तोडण्याचा प्रयत्न करू लागला व **२) राजेश केवलराव शेंडे वय ४३ वर्ष** हा गेटजवळ उभा होता तेवढयात फिर्यादीला आवाज आला असता तिने खिडकितुन पाहीले असता तो पळुन गेला. फिर्यादीने दार उघडुन गेट वरील व्यक्तीस धावुन पकडले व आरडा ओरड केली असता लोक जमा झाले व पोलीसांना फोन केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सचिन भाउरावजी हटवार, वय ४० वर्ष, रा. पाचगाव ता. उमरेड यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द ४५७, ३८०, ५११, ३४ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हरीहर सोनकुसरे, मो. नं. ८७८८८०११३३ हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील जिल्हा परिषद शाळा मंगसा येथे दि. १८/०६/२०२३ चे २३. ०० वा. ते दिनांक १९/०६/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– अतुल बाळकृष्ण निकोसे, वय ५० वर्ष, रा. प्लॉट नं १७ नाईक ले आउट सावनेर याने मंगसा प्राथमिक शाळा येथे जिर्ण अवस्थेत असलेल्या इमारतीचे रॉप्टर ६१,०००/–रु. मध्ये घेतले होते. इमारतीचे काम चालू असल्याने त्याच एका रुम मध्ये ठेवलेले जुने सागवनीचे रॉप्टर लांबी १५ फुटीचे ४० नग प्रत्येकी ५००/–रु. प्रमाणे किंमती २०,०००/–रु. मुद्देमाल खोलीमध्ये लॉकबंद करुन ठेवण्यात आला होता. त्या खोलीचे लॉक तोडुन कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक कामठे पोस्टे केळवद मो. नं. ८४१२०२७०७५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर